# वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय,
गडचिरोली. दिनांक २५/०१/२०१९

## *पोलीस नक्षल चकमकीत एक नक्षलवादी ठार*

मौजा कसनासुर येथील तीन निष्पाप आदिवासी बांधवांचा नक्षलवादयांनी निघृणपणे खुन केल्यानंतर सदर परिसरात गडचिरोली पोलीस दलातर्फे प्रभावी नक्षलविरोधी अभियान राबविणे सुरु करण्यात आले होते. सदर अभियान राबवित असतांना आज दुपारी १२.०० ते ०१.०० च्या दरम्यान पोलीस मदत केंद्र गट्टा (जां.) हद्दीतील हिक्केर जंगल परिसरात नक्षलवादयांनी पोलीसांना जिवे मारण्याच्या उद्देशाने पोलीस पथकाच्या दिशेने अंदाधुंद गोळीबार सुरु केल्याने स्वसंरक्षणार्थ पोलीस पथकातील जवानांनी प्रतिउत्तरादाखल नक्षलवादयांच्या दिशेने गोळीबार केला. पोलीसांचा वाढता दबाव पाहुन नक्षलवादी घनदाट जंगलाचा व पहाडीचा फायदा घेत घटनास्थळावरुन पळुन गेले.

यानंतर सदर परिसराची पाहणी केली असता घटनास्थळावर एक पुरुष नक्षलवादी मृत अवस्थेत तसेच शस्त्र, दारुगोळा व नक्षलवादयांचे दैनंदिन वापराचे साहित्य मिळुन आले. सदर मृत नक्षलवादयाची ओळख पटविण्याचे काम चालु असुन सदर जंगल परिसरात नक्षलविरोधी अभियान तिव्र करण्यात आले आहे.